सायबर सेल, पिंपरी चिंचवड

**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०**


**प्रेसनोट पिंपरी चिंचवड दिनांक - /०३/२०२४**

## शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवणुक करुन जास्तीत जास्त पैसे मिळुन देण्याचे अमिष दाखवुन आर्थिक फसवणुक

वाकड येथिल महीला ही फेसबुकवर पोस्ट बघत असताना तीला इन्वेस्टमेंन्ट संदर्भात IBKR, Cresset Acadamy, Goldman Sachs व्हॅटसअप ग्रुप दिसले असता ती महीला सदर ग्रुपला जॉईन झाली होती. सदर ग्रुममध्ये असलेल्या लोकांना रोजच्या रोज प्रॉफिट मिळत असल्याने तक्रारदार यांची सुध्दा पैसे गुंतवणुक करण्याची इच्छा झाली होती. त्यानंतर तक्रारदार यांना व्हॅटसअपव्दारे एका महीलेचा फोन आला आणि तीने तक्रारदार यांना सांगीतले की आपण त्याच्या **IBKR Securities** या कंपनीत पैसे गुंतवणुक करण्यास इच्छुक आहात का त्यावेळी तक्रारदार यांनी होकार दिल्यानंतर फिर्यादी यांना व्हॅटसअप व्दारे एक फॉर्म पाठवुन तो फॉर्म भरण्यासाठी सांगीतले होते. त्यानंतर तक्रारदार यांना वेगवेगळया बॅंकेच्या अकाऊंटला पैसे पाठविण्यासाठी तक्रारदार यांना सांगीतले होते. त्यावेळी आरोपी याने तक्रारदार यांना IBKR ॲपची लिंक पाठवुन ते ॲपडाऊनलोड करायला सांगीतले होते. सदर ॲपवर तक्रारदार यांनी भरलेले पैसे दिसत होते सोबतच प्रॉफिटपण दिसत होते. परंतु सदर ॲपवरुन तक्रारदार यांना पैसे काढुन घेता येत नव्हते. अशा प्रकारे तक्रारदार यांच्याकडुन IBKR **Securities,** Cresset Acadamy, Goldman Sachs या कंपनीत पैसे गुंतवणुक करायला लावुन अर्जदार यांची एकुण १०६९५७५/- रु आर्थिक फसवणुक केलेबाबत तक्रारदार यांनी वाकड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ३०६/२०२४ भा.द.वि. कलम ४१९, ४२० आय.टी. ॲक्ट ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदरचा गुन्हयाची व्याप्ती खुप मोठया प्रमाणावर असल्याने मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी सदरचा गुन्हा पोलीस निरीक्षक, सायबर सेल, गुन्हे शाखा यांच्याकडे वर्ग करण्याचे आदेशित केले होते. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने तांत्रिक विश्लेषणाव्दारे आरोपीचा शोध घेतला असता त्यातील आरोपी नामे विकास नेमीनाथ चव्हाण वय- ४३ वर्षे, व्यवसाय- फर्निचर व्यवसाय रा. मु.पो. फ्लॅट नं ९, अथर्व विहार बिल्डींग, गणेश नगर, नवी सांगवी. व अरोपी नामे प्रदिप कृष्णा लाड वय -३२ वर्षे, व्यवसाय – रिअल इस्टेट, रा. सर्वे नं ६३/४९, रामनगर पिंपळे गुरव, सांगवी यांना सदर गुन्हयात सहभाग असल्याने अटक करण्यात आले असुन त्यांच्याकडुन ०२ मोबाईल जप्त करण्यात आले आहे.

सदर गुन्हयात तक्रारदार यांनी आरोपी व इतर एकुण ११ बॅंक अकऊंटला पैसे भरलेले आहेत. सदर अकाऊंटची माहीती घेतली असता त्या अकाऊंटला एकुण **५० कोटी पेक्षा** जास्त रक्कमेचे ट्रान्झेक्शन झाले असल्याची प्राथमिक माहीती प्राप्त झालेली आहे. तसेच अटक आरोपीविरुध्द भारतातील इतर राज्यात २० तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच या पुर्वी वरील आरोपीवर आशाच प्रकारचे गुन्हे दाखल असलेचे तपासात निष्पंन्न झाले आहे.

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे पोलीस उपआयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड, मा.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि वैभव शिंगारे, सपोनि सागर पानमंद, सपोनि प्रविण स्वामी, पोलीस उपनिरीक्षक सागर पोमन, पोशि २५६२ नितेश बिचेवार, पोशि २५६३ अतुल लोखंडे, पोशि ३०८० श्रीकांत कबुले, पोशि २३०० कृष्णा गवळी, पोशि ३५३६ रजनिश तारु (सर्व नेमणुक सायबर सेल) यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.